# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 18/04/2020 (शनिवार)
(सकाळ)

### मोटरसायकल चोरी

पो.स्टे. मौदा :— अंतर्गत 17 कि.मी अंतरावर कडोली येथे दिनांक 16/04/2020 चे 17.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे— राहुल हिरामण वासनिक, वय 28 वर्ष, रा. कडोली याने त्याची एमएच— 40/एएन— 9133 क्रमांकाची मोटरसायकल रात्री दरम्यान अंगणात उभी करून ठेवली होती. दरम्यान अज्ञात आरोपीने फियादीची किमती 20,000/—रू. ची मोटरसायकल चोरून नेली.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार काळे 9822549695 हे करीत आहे.

### विनयभंग

1) पो.स्टे. कुही :— दिनांक 16/04/2020 चे 18.00 ते 18.30 वा. दरम्यान 17 वर्षीय फिर्यादी/पीडित हिचे वडीलांना काळमिया रोग असल्याने औषध आणण्याकरीता जात असतांना आरोपी क्र. 1) निलेश रामा बोरकर याने पीडितेला अश्लिल शब्द म्हणुन तिचा विनयभंग केला. यानंतर पीडितेने सदर बाब वडीलांना व भावाला सांगीतले असता पीडितेच्या भावाने आ.क्र. 1 यास हटकले असता आरोपी क्र. 1), 2) बंडु रामदास सहारे व 3) संबधे बंडु सहारे सर्व रा. खोबना यांनी संगनमत करून पीडितेच्या भावास मारहाण केली. तसेच पीडितेचे आई व वडील घटना स्थळा वरील बौध्द विहाराजवळ आले असता आरोपीतांनी पीडीतेचे वडीलांचा हात ओळुन त्यांना मारहाण केली व आईला ओढताण करून खाली पाडुन तिचा विनयभंग केला व पीडितेचे टी—शर्ट फाडुन विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354 अ, (1),(4), 323, 34 भा.दं.वि. सहकलम 12 बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि सोनाली राठोड 7038583989 या करीत आहे.

2) पो.स्टे. कुही :– दिनांक 16/04/2020 चे 18.00 ते 19.00 वा. दरम्यान 15 वर्षीय फिर्यादी/पीडित आरोपी क्र. 1) करण देशपांडे व तिचे भावाचे भांडण सोडवायला गेली असता करण देशपांडे याने पीडीतेला गालावर थापडा मारून तीला ढकलुन तिचा विनयभंग केला. तसेच शेजारी राहणारे बंडु सहारे हे पीडितेच्या मदतीला आले असता त्यांनाही आरोपी क्र. 1), 2) दामोदर देशपांडे, वय 45 वर्ष, 3) नितीन सहारे, वय 23 वर्ष व 4) सुरज सहारे, वय 25 वर्ष, रा. खोबना यांनी मारहाण केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 354, 34, 323 भादवि, सहकलम 12 बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि तकित 8766934595 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर